# प्रेम फाऊंडेशन,नाशिक

## वार्षिक अहवाल - २०२४-२५

प्रेम फाऊंडेशन,नाशिक च्या माध्यमातून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातही नियोजनानुसार नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील आदिवासी गावांच्या सर्वांगीण विकासासाठी लोकांच्या मदतीने प्रयत्न करण्यात आले.सोबतच सामाजिक जबाबदारी म्हणून संस्थेद्वारा सुरु असलेले विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान,प्रेमांगण वृद्धाश्रम,महिला सक्षमीकरण,पर्यावरण संवर्धन, एच.आय.व्ही./एड्स प्रतिबंध या सारखे अनेकविध उपक्रम या आर्थिक वर्षात राबविण्यात आले.त्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :-

**विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान :-** सन २०२२ पासून सुरु झालेले विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान हळूहळू बाळसे धरू लागले असून ते देशपातळीवर पुढे जावू लागले आहे.असे असले तरी शहर आणि जिल्हा पातळीवर देखील त्याला वेग येवू लागला आहे.याचाच भाग म्हणून सार्वजनिक उपक्रमांमध्ये विधवा महिलांचा सहभाग,शुभ कार्यात विधवा महिलांचा सहभाग,सोबतच शासकीय योजनांचा लाभ,विधवा महिलांचे हळदी-कुंकू,जागतिक विधवा महिला दिन साजरा होणे या सारख्या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून विधवा महिलांना सन्मान मिळू लागल्याने या अभियानाचा हेतू पुढे जातांना दिसतो आहे.







लोकशक्ती NEWS24

मुख्य संपादक - प्रा. विजय लेंडाळ | संपादक - रावसाहेब निकाळजे

१० ऑक्टोबर २०२४, अहिल्यानगर

### शेवगावात उद्या विधवा महिला सन्मान व संरक्षण सोहळ्याचे आयोजन

शेवगाव - स्त्री शक्ती फाऊंडेशन, शेवगाव व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या शुक्रवार दि ११ रोजी सकाळी ११ वाजता स्व. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील जिनिंग नेवासा रोड, शेवगाव येथे विधवा महिला सन्मान व संरक्षण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याबाबतची स्त्री शक्ती फाऊंडेशन शेवगाव येथील संस्थापक प्रमेश सोनवणे, उपाध्यक्ष फरजाना बागवान, सय्यद व सचिव रजना प्रमेश सोनवणे यांनी दिली आहे. या बाबत माहिती देताना ते म्हणाले की, कोल्हापूर येथील विधवा सन्मान कायद्याचे जनक प्रमोद झिंजाडे यांच्या पुढाकारातून राज्यात गेली अनेक महिन्यांपासून विधवा महिलांना त्यांचे न्याय व हक्क मिळावेत म्हणून लढा देत असून त्यांच्या या लढ्यामुळे राज्यातील हजारो महिलांना त्याचा मोठा आधार मिळाला असल्याने त्याच धर्तीवर उद्या शेवगावात विधवा महिला सन्मान व संरक्षण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. राजश्रीताई घुले उपस्थित राहणार असून महिला बालविकास अधिकारी नारायण कराळे यांचे हस्ते उदघाटन होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून विधवा महिला कायद्याचे जनक प्रमोद झिंजाडे व राज्य समन्वयक राजुभाऊ शिरसाठ यांचेसह सितिजभैय्या घुले, तहसीलदार प्रशांत सांगडे, पो. नि. समाधान नागरे, गटविकास अधिकारी अजितकुमार बागर, एकल महिला पुनर्वसन समितीचे प्रदेश निमंत्रक हेरंब कुलकर्णी, काकासाहेब नरवडे, अरुण लांडे, संजय फडके, ताहेर पटेल, शरद अरगडे व प्रहार दिव्यांग संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्षा लक्ष्मीताई देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार असून तालुक्यातील विधवा महिलांसह इतरही महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असेही आवाहन सोनवणे व सय्यद यांनी केले आहे.



विधवा महिलाओं की बैठक में विभिन्न मुद्दों पर चर्चा

### विधवा महिलाओं को समाज में सम्मान मिलना चाहिए

महानगर नेटवर्क

नाशिक

विश्व विधवा दिवस के अवसर पर रविवार को रुंगटा हाई स्कूल, घरपुरे घाट में विधवाओं की एक सभा का आयोजन किया गया। महिलाओं के विभिन्न मुद्दों और समस्याओं पर मंथन किया इस दौरान कई विधवा महिलाओं ने अपनी समस्याएं रखीं। आशा व्यक्त की कि विधवा महिलाओं को समाज में सम्मान मिलना चाहिए। विधवा महिला सम्मान एवं सुरक्षा मिशन, नाशिक के प्रतिनिधियों की यह सभा राज्य समन्वयक राजू शिरसाठ की उपस्थिति में आयोजित की गई। इस अवसर पर वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ता मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, प्रो.डॉ. सिंधु काकडे, शोभा वाले, कल्याणी पवार, शांता सरला कामोद आदि उपस्थित थे।

**समस्याओं के समाधान के लिए संपर्क शुरू**

विधवा महिलाओं का सर्वेक्षण पूरा करना, विधवा महिलाओं की समस्याओं के समाधान के लिए शुरू किए गए संपर्क कार्यालय को सक्रिय करना, कौशल प्रशिक्षण का आयोजन करना, उद्योग और व्यवसाय खड़ा करने का प्रयास करना और इन सभी मामलों को लागू करने के लिए जिम्मेदारियां बांटना, समय तय करना इस सभा में कार्यान्वयन की सीमा आदि विषयों पर निर्णय लिया गया। इस अवसर पर शहर की विधवाएं, सामाजिक संगठनों के प्रतिनिधि एवं कार्यकर्ता उपस्थित थे।

प्रेम फाऊंडेशन
एफ-13525/12
नाशिक
नाशिक

या अभियानाची जनजागृती होण्याच्या दृष्टीने अफार्म संस्था पुणे यांच्या पुढाकाराने १७ मिनिटांचा लघुपट तयार करण्यात आला.यामुळे हे अभियान लोकांपर्यंत घेवून जाण्यासाठी मोठी मदत झाली.

**प्रेमांगण वृद्धाश्रम,नाशिक :-** वृद्ध व्यक्तींना योग्य त्या खर्चात योग्य अशा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेले प्रेमांगण वृद्धाश्रम सुयोग्य पद्धतीने सुरु असून या वृद्धांना ना नफा ना तोटा या तत्वावर उत्कृष्ट राहण्या-खाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये आजी आजोबा आनंदात आहेत.हीच खरी जमेची बाजू आहे.






**एच.आय.व्ही.सह जीवन जगणाऱ्या व्यक्तींसाठी वधू-वर परिचय मेळावा :-** समाजामध्ये एच.आय.व्ही. सारख्या दुर्धर आजारासह जगणाऱ्या व्यक्तींच्या विवाहाचा प्रश्न मोठा गंभीर आहे.सोबतच या आजारात त्यांना शरीरासोबतच मानसिक आधाराचीही आवश्यकता असते.या परिस्थितीवर मार्ग काढण्याच्या हेतूने अशा एच.आय.व्ही.सह जगणाऱ्या व्यक्तींचा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले जात आहे.ह्या वर्षीचा हा १० वा मेळावा रोटरी क्लब हॉल,खडकाळी सिग्नल जवळ,शालीमार नाशिक येथे पार पडला.





या मेळाव्यात 200 वधु-वरांसह जवळपास ५०० व्यक्तींनी सहभाग घेतला तर या मेळाव्या अंती १० जोडप्यांच्या विवाहाची प्राथमिक पसंती होऊन त्यांच्या विवाहाचा मार्ग मोकळा झाला तर उर्वरित व्यक्तींना उपस्थित वधू वरांसोबत संपर्क साधण्याची संधी उपलब्ध झाली.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी अनेक समविचारी संस्थांची मदत झाली.



देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com
10 Dec 2024 · Page 2 city

ऋणानुबंध मेळाव्यात तीनशे जण सहभागी

▸▸ नाशिक | प्रतिनिधी



नाशिक मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२४

एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींसाठीचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- एन. जी. ओ. फोरम नाशिक, प्रेम फाऊंडेशन, एन. एन. पी. प्लस संस्था, तुळजाई बहुउद्देशीय संस्था, साईकेअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने एच. आय. व्ही. सह जीवन जगणाऱ्या विवाहेच्छुक व्यक्तींसाठीचा दहावा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा रोटरी क्लब हॉल, नाशिक येथे नाशिक जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण पथकाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी योगेश परदेशी, प्रेम फाऊंडेशनचे अध्यक्ष राजू शिरसाठ, ए. आर. टी. सेंटर, नाशिकचे समुपदेशक अशोक शिरसाठ, साई केअर सेंटरचे प्रकाश कुमावत, तुळजाई बहुउद्देशीय संस्थेच्या शोभा काळे व शशांक हिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच पार पडला.

या मेळाव्यात ३०० हून अधिक व्यक्तींनी सहभाग घेतला. याबाबत सविस्तर वृत्त असे, की एच. आय. व्ही. सह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना आपला आयुष्याचा जोडीदार शोधण्यासाठी व्यासपीठ मिळावे व यातून आपला आयुष्याचा जोडीदार शोधूनन त्याच्यासोबत उर्वरित आयुष्य एकमेकांच्या आधाराने सुखाने जगता यावे, या उद्देशाने सुरु केलेल्या या एच. आय. व्ही. सह जीवन जगणाऱ्या विवाहेच्छुक व्यक्तींसाठीच्या मेळाव्यास दहा वर्षे झाली. या कालावधीत शेकडो लोकांनी या व्यासपीठाचा लाभ घेतला, तर त्यातून आजतागायत ९० हून अधिक विवाह जुळून आले आहेत.

या मेळाव्यात वधू-वर परिचयासोबतच विवाहपूर्व व विवाहापश्चातच्या वर्तणुकीबाबतचे समुपदेशन, नियमित वैद्यकीय तपासणी व औषधोपचार, लक्षणांवर आधारित वैद्यकीय उपचार पद्धतीच्या अवलंबनासाठी वैद्यकीय सल्ला आदी बाबींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या वधू-वर परिचय मेळाव्यात चार विवाह जुळले असून, तीन विवाह प्रक्रियेमध्ये आहेत. या वधू-वर मेळाव्याच्या यशस्वितेसाठी मुक्तेश्वर मुनशेट्टीवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमोद भालेराव, मंगेश पाळीकराव, निखिल सवंदरे, दीपाली नाले, सरला मंडलिक, ज्योती शिंदे, पद्मा जाधव, रवी पाळदे, शीतल हजारे, राज गमे व भारती कुंभार्डे यांनी केले.

**ग्रामीण महिला उपजीविका सक्षमीकरण कार्यक्रम :-** इंडिगो एअर लाईन्स च्या आर्थिक सहकार्याने व अफार्म संस्था पुणे यांच्या तांत्रिक सहकार्याने नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील आंबेवाडी,खड्केद,इंदोरे,वासाळी,बारशिंगवे या आदिवासी गावांमधील 1800 आदिवासी गरीब गरजू महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.यात प्रामुख्याने :-**अ)**जनजागृती आणि प्रचार प्रसार :- नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील आंबेवाडी,खड्केद,इंदोरे,वासाळी,बारशिंगवे या आदिवासी गावांमधील 1800 आदिवासी गरीब गरजू महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती सर्व महिलांना व्हावी.सोबतच या प्रकल्पातील विविध घटकांची रचना,त्यांची भूमिका व जबाबदा-यांची माहिती सर्वांना होण्याच्या दृष्टीने गावनिहाय जनजागृती सभा घेण्यात येवून प्रकल्पाची विस्तृत माहिती सर्व महिलांना देण्यात आली.





**ब)**उद्योग/व्यवसाय सुरु असलेल्या महिलांना आपल्या व्यवसाय वाढीसाठी फिरत्या निधीतून प्रत्येकी १० हजार प्रमाणे ४५ महिलांना ४ लाख ५० हजार रु.च्या निधीचे वाटप.

**क)**५०महिला शेतकऱ्यांच्या १०० एकर शेतीत सेंद्रिय शेतीला सुरुवात त्यासाठी गांडुळ खत बायोचार,

यलोस्टिकी कार्ड या सारख्या कृषी निविष्ठांचे वाटप





ड)प्रकल्प क्षेत्रातील पाचही गावातील पशुधनाचे लसीकरण करण्यात आले.





इ)नारी आदिवासी महिला कृषी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून ८ लाख रु.निधीच्या वापरातून ४०० पोती भात खरेदी सोबतच गांडुळ खत प्रकल्पाची उभारणी आली आहे.






ई)प्रकल्प गावासोबतच परिसरातील ग्रामस्थांना शासकीय योजनांसोबतच आवश्यक ती कागदपत्र ऑनलाईन काढता यावीत म्हणून प्रकल्पाच्या पाचही गावात “हक्कदर्शिका”ची निवड करून त्यांच्या प्रशिक्षणानंतर ऑनलाईन(सायबर कॅफे) केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे.

उ)प्रकल्प क्षेत्रातील पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी गावपातळीवर सुविधा व्हावी म्हणून पाचही गावात “पशुसखींची” निवड करून प्रशिक्षणानंतर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ऊ)प्रकल्प क्षेत्राच्या पाचही गावात उभारणी केलेल्या ग्रामसंघाचे सदस्य,उत्पादक गटाचे सदस्य,फिरता निधी घेवून नव्याने व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या महिला,सुरु असलेले व्यवसाय पुढे घेवू जावू इच्छिणाऱ्या महिला,नारी कृषी उत्पादक कंपनीचे सदस्य,सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला शेतकरी या

सर्वांची विविध विषयांची कौशल्य व क्षमता बांधणीची विविध प्रशिक्षणे घेण्यात येवून या महिलांची क्षमता बांधणी करण्यात आली आहे.




यात मुख्यत्वे अल्पखर्चीं कृषी तंत्रज्ञान,सेंद्रिय शेतीसाठीच्या निविष्ठा निर्मिती जसे-जीवामृत,बिजामृत,दशपर्णी अर्क,शेळीपालनाचे तंत्र, बिगर शेतीविषयक  व्यवसायाच्या यशस्वीतेचे तंत्र,उद्योजकता विकास,व्यवसाय नियोजन (बिजनेस प्लान) इ.ची प्रशिक्षणे घेण्यात आली.

ए)पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने प्रकल्पाच्या पाचही गावात लोकांच्या सक्रीय सहभागाने विविध प्रजातींच्या १००००(दहा हजार) रोपांची लागवड करण्यात आली.या लागवडी पैकी आजमितीस जवळपास ८० प्रतिशत रोपं जिवंत आहेत.




ऐ)प्रकल्प क्षेत्रातील महिलांची क्षमता बांधणी सोबतच त्यांच्या आचार-विचारात प्रगल्भता यावी म्हणून सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांची अभ्यास सहल कृषी विज्ञान केंद्र,नाशिक येथे नेण्यात आली. या ठिकाणच्या कृषी तज्ञांनी या महिलांना विविध प्रत्याक्षित दाखवीत या महिलांच्या शंकांचे निरसन केले. तर नारी आदिवासी महिला कृषी उत्पादक कंपनीच्या संचालक व सभासदांची अभ्यास सहल













शेवगाव जि.अहिल्यानगर येथील नाथ कृषी उत्पादक कंपनीच्या धान्य खरेदी-विक्री,आटा निर्मिती प्रकल्पास भेट देण्यात येवून कंपनीच्या सर्व व्यवहारांची माहिती घेण्यत आली.

**ओ)**प्रकल्प क्षेत्रातील ग्रामस्थांना आपल्या गावातच विविध शासकीय योजनाचा लाभ घेता यावा म्हणून गावनिहाय शासकीय योजना शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीराचा लाभ घेत अनेकांनी पॅन कार्ड काढणे,बँक खाते उघडणे,नवीन रेशन कार्ड काढणे,रेशनकार्ड मध्ये नाव दुरुस्ती करणे,संजय गांधी निराधार योजना,इंदिरा गांधी वृद्धापकालीन पेन्शन योजना,घरकुल योजना,विधवा महिला पेन्शन योजना,उत्पन्नाचा दाखला काढणे,जातीचा दाखला काढणे,डोमेसाईल व डोंगरी प्रमाणपत्र काढणे,नॉन क्रिमिलेअर दाखला काढणे या अशा अनेक योजनांचा लाभ ग्रामस्थांना गावपातळीवर एकाच छताखाली घेता आला. या व अशा अनेकविध उपक्रमांच्या अंमलबजावणी च्या माध्यमातून समाजकार्याचा हा रथ पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे..







# नवभारत

www.navbharatlive.com

## महिलाओं का संगठित होना आवश्यक

■ सातपुर. (सं.) महिला एवं बाल विकास विभाग के उपायुक्त चंद्रशेखर पगारे ने कहा कि ग्रामीण महिलाओं के सर्वव्यापी सशक्तिकरण के लिए महिलाओं को संगठित होना आवश्यक है. वह इगतपुरी तहसील के आंबेवाड में कृषि एवं पशुधन आधारित सरकारी योजनाओं के लिए आयोजित शिविर तथा ग्राम संघ पदाधिकारियों एवं प्रमोटरों के लिए सरकारी योजनाओं को जोड़ने एवं समन्वय करने के लिए आयोजित शिविर में बोल रहे थे. इस समय एन.जी.ओ. फोरम के अध्यक्ष मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, प्रेम फाऊंडेशन के अध्यक्ष राजू शिरसाठ, अफार्म संस्था के कृषि विकास अधिकारी रुपेश डगे, उपसरपंच अनुसया सदगीर, विनायक आव्हाड, आकाश भोले, किशोर कांबळे, स्वदेश फाऊंडेशन के आकाश शिंदे सहित अन्य गणमान्य उपस्थित थे. यह व्यापक कार्यक्रम ग्रामीण क्षेत्रों में महिलाओं को आर्थिक आत्मनिर्भरता की ओर ले जाने के मुक्तेश्वर मुनशेट्टीवार के सपने को साकार करने की दिशा में एक महत्वपूर्ण कदम है. यद्यपि परंपरागत रूप में महिलाओं की भूमिका घरेलू जिम्मेदारियों तक ही सीमित मानी जाती रही है, लेकिन उनकी क्षमता कृषि, पशुपालन और लघु उद्योगों के क्षेत्र में बड़ी क्रांति ला सकती है. शिविर सफलता के लिए प्रकल्प व्यवस्थापक शंकर केकरे, प्रेरणा सखी अनिता कोरडे, कुशाबाई केकरे, पशु सखी लिलाबाई खाडे, ज्योति केकरे, हकदर्शिका स्वाती झोले, विश्वास कोरडे, अरुण केकरे आदि ने कड़ी मेहनत की.

Nashik plus Edition
Mar 22, 2025 Page No. 4
Powered by: navbharatlive.com



# लक्ष महाराष्ट्र

## ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांनी संघटीत होणे गरजेचे- चंद्रशेखर पगारे

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

ग्रामीण महिलांच्या सार्वत्रिक सक्षमीकरणासाठी महिलांनी संघटीत होणे गरजेचे आहे असे आवाहन महिला व बाल विकास विभागाचे उपायुक्त चंद्रशेखर पगारे यांनी केले. ते जागतिक महिला दिनाच्या औचित्याने कृषी व पशुधन आधारित शासकिय योजनांचे शिबिर आणि ग्रामसंघ पदाधिकारी व प्रवर्तक शासकिय योजना जोडणी व समन्वयन शिबीरप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ग्रामीण भागातील महिलांना कृषी व पशुधन व्यवसायात सशक्त करण्यासाठी आणि शासकीय योजनां विषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने इंडिगो एअर लाईन्स अर्थसहाय्यीत, अफार्म संस्था पुणे मार्गदर्शित व प्रेम फाऊंडेशन, नाशिक संचलित एकात्मिक ग्रामीण महिला उपजिविका सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत जागतिक महिला दिनाच्या औचित्याने कृषी व पशुधन आधारित शासकिय योजनांचे शिबिर आणि ग्रामसंघ पदाधिकारी व प्रवर्तक शासकिय योजना जोडणी व समन्वयन शिबीराचे आयोजन आंबेवाडी ता.इगतपुरी येथे करण्यात आले होते.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी प्रकल्पातील प्रकल्प कार्यकर्त्यांची टीम,संस्थेस मदत करणारे सर्व स्थानिक पदाधिकारी,ग्रामपंचायतींचे सरपंच,सदस्य,विविध शासकीय विभागांचे अधिकारी -कर्मचारी,प्रकल्प क्षेत्रात कार्यरत असलेल्या सामाजिक संस्था,अर्थसहाय करणारी इंडिगो एअर लाईन्स संस्था दिल्ली,तांत्रिक सहाय्य करणारी अफार्म संस्था पुणे,एन.जी,ओ.फोरम नाशिक मधील विविध समविचारी संस्था यांची मोलाची साथ लाभली.या सर्व सहकार्यांचे शतशः आभार !

प्रेम फाऊंडेशन एफ-13525/12 नाशिक

अध्यक्ष
प्रेम फाऊंडेशन
नाशिक